प्रेस प्रकाशनी **PRESS RELEASE**

भारतीय रिज़र्व बैंक
**RESERVE BANK OF INDIA**

वेबसाइट : www.rbi.org.in/hindi
Website : www.rbi.org.in
ई-मेल/email : helpdoc@rbi.org.in

**संचार विभाग,** केंद्रीय कार्यालय, शहीद भगत सिंह मार्ग, फोर्ट, मुंबई - 400 001
**Department of Communication**, Central Office, Shahid Bhagat Singh Marg, Fort, Mumbai - 400 001 फोन/Phone: 022 - 2266 0502

22 जानेवारी 2026

**भारतीय रिझर्व बँकेने श्री कन्यका नागरी सहकारी बँक लिमिटेड, चंद्रपूर, महाराष्ट्र वर आर्थिक दंड ठोठावला**

भारतीय रिझर्व बँकेने (आरबीआय) दिनांक 20 जानेवारी 2026 रोजीच्या आदेशाद्वारे श्री कन्यका नागरी सहकारी बँक लिमिटेड, चंद्रपूर, महाराष्ट्र (बँक) वर, 'बांधकाम व्यावसायिक (बिल्डर्स)/ कंत्राटदार यांना दिले जाणारे कर्ज' याबाबत आरबीआयने जारी केलेल्या काही निर्देशांचे पालन न केल्याबद्दल ₹ 8 लाख (केवळ आठ लाख रुपये) चा आर्थिक दंड ठोठावला आहे. बँकिंग नियमन कायदा, 1949 च्या कलम 46(4)(i) आणि कलम 56 सह लागू असलेल्या कलम 47A(1)(c) अन्वये आरबीआयला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून हा दंड ठोठावण्यात आला आहे.

31 मार्च 2025 रोजीच्या आर्थिक स्थितीवर आधारित बँकेची वैधानिक तपासणी आरबीआयद्वारे केली गेली होती. या तपासणी अहवालातील आरबीआयच्या दिशानिर्देशां चे पालन न केल्याचे पर्यवेक्षी निष्कर्ष आणि त्या संदर्भात केलेल्या पत्रव्यवहाराच्या आधारे बँकेला नोटीस बजावण्यात आली होती, ज्यामध्ये, सदर तरतुदींचे आणि निर्देशांचे पालन करण्यात अयशस्वी झाल्याबद्दल दंड का लावू नये याची कारणे दाखवा, अशी विचारणा करण्यात आली होती. नोटीसला बँकेने दिलेले उत्तर आणि त्यानंतर सादर केलेले अतिरिक्त निवेदन विचारात घेता आरबीआय, इतर गोष्टींबरोबर या निष्कर्षावर पोहोचली की आरबीआयच्या खालील निर्देशाचे पालन न केल्याचे आरोप सिद्ध होतात आणि आर्थिक दंड लावला जाणे आवश्यक आहे.

बँकेने बांधकाम व्यावसायिकांना (बिल्डर)/ कंत्राटदारांना कर्जे मंजूर केली होती, जी अंशतः जमीन संपादन करण्यासाठी वापरली गेली.

ही कृती नियामक अनुपालनातील कमतरतांवर आधारित आहे आणि यात बँकेने तिच्या ग्राहकांशी केलेल्या कोणत्याही व्यवहारांच्या किवा करारांच्या वैधतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्याचा हेतू नाही. तसेच, बँकेविरुद्ध आरबीआयने सुरू केलेल्या इतर कोणत्याही कारवाईबद्दल पूर्वग्रह न ठेवता हा आर्थिक दंड लावला आहे.

**(ब्रिज राज)**
मुख्य महा प्रबंधक

**प्रेस प्रकाशनी** : **2025–2026/ 1972**